## प्रेसनोट

दि. २९/०५/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून दौंड पोलीस स्टेशनमधील पोलीस अंमलदार यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. गु.र.नं. ३९०/२०२५, |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४० वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. रमेश शिवाजी करचे, वय ३६ वर्ष, पद - पोलीस शिपाई, ब.नं. २७०५, दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- (दहा हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| लाच मागणी पडताळणी दिनांक | ०७/०४/२०२५ |
| ठिकाण | गोल राऊंड चौकाजवळ, हॉटेल शिवाई समोर, ता. दौंड, जि. पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. विजय पवार, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ८६०५००११९६) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचेवर दौंड पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गु.र.नं. ८८२/२०२५ या गुन्ह्यात त्यांची महिंद्रा जीप क्र. **MH 42 / AS 6658** ही गाडी जप्त होती. तक्रारदार यांनी गुन्ह्यातील जप्त गाडी परत मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्या अर्जावर तपासी अधिकारी यांचे म्हणणे दाखल करण्यासाठी गुन्ह्याचे तपास अधिकारी लोकसेवक सहायक पोलीस निरीक्षक श्री. पाटील व लेखनिक पो.शि. रमेश करचे यांनी तक्रारदाराकडे १०,००० रुपयाची मागणी करुन, तडजोडीनंतर ५,००० रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार दि. ७/०४/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ७/०४/२०२५ रोजी लोकसेवक पो.शि. रमेश करचे यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदाराविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली त्यांची महिंद्रा बोलेरो जीप ही न्यायालयातून परत मिळण्यासाठी तक्रारदाराने दाखल केलेल्या अर्जावर म्हणणे सादर केल्याचा मोबदला म्हणून लोकसेवक पो.शि. रमेश करचे यांनी तक्रारदाराकडे स्वतःसाठी व तपास अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांचेसाठी सुरवातीस १०,००० रुपयाची लाचेची मागण करुन, तडजोडीअंती ५,००० रुपयाची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, लोकसेवक रमेश शिवाजी करचे याचेविरुद्ध आज दि. २९/५/२०२५ रोजी दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.र.नं. ३९०/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

२९/५/२५

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते

Scanned with CamScanner